॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
स्वप्ने ती नाहीत जी झोपेत पडतात,
तर स्वप्ने ती आहेत जी तुम्हाला
झोपू देत नाहीत.

अहिल्यानगर | शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ | वर्ष ७ वे | अंक ६१ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## SPOT NEWS

### देशातील ३८ व्याघ्रप्रकल्प संकटात

**नवी दिल्ली** – देशातील वाघांची संख्या वाढून भारतात जगातील सुमारे ७५ टक्के वाघ असल्याचा दावा केंद्र सरकारकडून केला जात आहे. मात्र, राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरणाच्या(एनटीसीए) नवीन अहवालाने व्याघ्रसंवर्धनातील गंभीर वास्तव समोर आणले. देशातील ५८ व्याघ्रप्रकल्पांपैकी तब्बल ३८ प्रकल्पांमध्ये भक्ष्य प्राण्यांची संख्या घटली आहे, अधिवासाचा दर्जा खालावला आहे. याशिवाय नऊ व्याघ्रप्रकल्पांपैकी काहींमध्ये वाघच नाहीत, तर काहींमध्ये संख्या अत्यंत कमी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या रोडमॅप फॉर ॲक्टिव्ह मॅनेजमेंट ऑफ टायगर्स इन इंडिया या अहवालातील विश्लेषण २०२२ च्या अखिल भारतीय व्याघ्र गणनेवर आधारित आहे. २०२७ मध्ये ताजी गणना जाहीर होणार आहे. या अहवालानुसार, केवळ २० व्याघ्रप्रकल्पांमध्ये दर्जेदार अधिवास आणि पुरेसा भक्ष्यसाठा या दोन्ही बाबी समाधानकारक आहे. त्याठिकाणी वाघांची संख्या स्थिर आणि वाढती आहे. उर्वरित बहुतांश प्रकल्पांमध्ये भक्ष्यसाखळी, अधिवास किंवा दोन्ही बाबतीत गंभीर उणिवा आहेत.

### दहीहंडीतील गोविंदांना १० लाखांचे विमा संरक्षण

**मुंबई** – ढाक्कूमाक्कूमच्या तालावर दहीहंडीच्या थरारात मानवी मनोरे रचणाऱ्या गोविंदांना विम्याचे कवच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या राज्यातील १ लाख ६० हजार गोविंदांना अपघात काढण्यात येणार असून यामध्ये मानवी मनोरे रचताना अपघाती मृत्यू झाल्यास किंवा कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपयांची भरपाई मिळणार आहे. याशिवाय अपघातग्रस्त गोविंदांच्या उपचारासाठी एक लाख रुपयांपर्यंतचा खर्चही शासन उचलणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. दहीहंडी उत्सवात मानवी मनोरे उभारण्याच्या खेळास साहसी क्रिडा प्रकाराचा दर्जा देण्यात आला आहे. मात्र, दहीहंडी उत्सवादरम्यान अपघातग्रस्त होणाऱ्या गोविंदांना मोफत उपचार करण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला आहे.

# विरोधक आक्रमक, कामकाज तहकूब

## विविध मुद्यांवरुन अमित शाह यांनी सभागृहत येवून उत्तर देण्याची मागणी

**नवी दिल्ली । वीरभूमी** – देशभरात आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईसह विविध मुद्यांवर सरकारने उत्तर द्यावे, त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात यावे, अशी मागणी करत विरोधकांनी आपला आक्रमक पवित्रा कायम ठेवला आहे. त्यामुळे सरकारची कोंडी झाली आहे. संसदेचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी आजही आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे गुरुवारी लोकसभेचे आणि राज्यसभेचेही कामकाज तहकूब करावे लागले.



कामकाजाच्या सुरुवातीला हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्यांच्या स्मृतिदिनानिमित्त सभागृहात त्या हल्ल्यांतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सर्व सदस्यांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना आदरांजली अर्पण केली. त्यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी २० जुलै रोजी विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलिस कारवाईच्या मुद्यावरून घोषणाबाजी सुरू केली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात उपस्थित राहावे, अशी मागणी केली. काही सदस्यांच्या हातात फलकही दिसून आले. गदारोळ सुरूच राहिल्यानंतर ओम बिर्ला यांनी सदस्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र विरोधकांनी आक्रमक भूमिका कायम ठेवली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात उपस्थित राहावे, अशी मागणी लावून धरली. गदारोळ कायम राहिल्याने लोकसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. राज्यसभेतही तसाच गदारोळ सुरू राहिला. त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूव करावे लागले.

यापैकी सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६, राष्ट्रीय सन्मानाचा अवमान प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२६, जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, २०२६ आणि सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक, २०२६ या चार विधेयकांना राज्यसभेचीही मंजुरी मिळाली आहे.

## अग्नी-४ बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी; शत्रु देशांची झोप उडाली

**चांदीपूर । वीरभूमी** – भारताची लष्करी क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे. अशातच आज ओडिशातील चांदीपूर येथील इंटिग्रेटेड टेस्ट रेंजमधून अग्नी-४ या मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी पार पडली. ही चाचणी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड यांच्या देखरेखीखाली पार पडली. चाचणीदरम्यान क्षेपणास्त्राचे सर्व ऑपरेशनल आणि तांत्रिक निकष यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याचे मंत्रालयाने सांगितले. यामुळे भारताचे शत्रू चीन आणि पाकिस्तानची झोप उडाली.

अग्नी-४ च्या यशस्वी प्रक्षेपणामुळे भारताची स्ट्रॅटेजिक डिटेरेन्स क्षमता आणखी मजबूत झाली आहे. आजच्या चाचणीत अग्नी-४ क्षेपणास्त्राने नियोजित मार्गाने उड्डाण करत सर्व लक्ष्ये अचूकपणे गाठली. या चाचणीमुळे भारताच्या अण्वस्त्र-सक्षम बॅलिस्टिक क्षेपणास्त्र मालिकेची ताकद पुन्हा एकदा समोर आली. अग्नी-४ हे दोन टप्प्यांचे घन



इंधनावर चालणारे इंटरमीडिएट रेंज बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे. याची मारक क्षमता सुमारे ४ हजार किलोमीटर आहे.

सुमारे २० मीटर लांब आणि १७ हजार किलो वजनाचे हे क्षेपणास्त्र अण्वस्त्र तसेच पारंपरिक वॉरहेड वाहून नेण्यास सक्षम आहे. हे क्षेपणास्त्र संरक्षण संशोधन आणि विकास संस्था यांनी विकसित केले असून भारत डायनॅमिक्स लिमिटेड यांनी त्याची निर्मिती केली आहे. याचे प्रक्षेपण रोड मोबाइल लॉन्चरमधून करता येते, त्यामुळे त्याची तैनाती जलद आणि अधिक प्रभावी ठरते.

## जातीय जनगणनेत ओबीसी कॉलमचा समावेश करणार

**मुंबई । वीरभूमी** – राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने बंगळुरू येथे आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या राष्ट्रीय अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी समाजाला एक मोठे आणि महत्त्वपूर्ण आश्वासन दिले आहे. आगामी जातीय जनगणनेमध्ये ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश करणार असल्याचे आश्वासन दिले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ७ ऑगस्ट रोजी हे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह देशभरातील विविध राज्यांतील प्रतिनिधी, विचारवंत आणि ओबीसी समाजाचे नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या व्हीडीओ संदेशातून ओबीसी महासंघाला शुभेच्छा दिल्या आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर सविस्तर भाष्य केले. आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्याच्या मागणीला फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून जनगणनेत या कॉलमचा समावेश केला जाईल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. या अधिवेशनात ओबीसी समाजाच्या हितासाठी आणि प्रगतीसाठी जे काही ठराव संमत केले जातील, ते राज्य सरकार नक्कीच अमलात आणेल, असा महत्त्वपूर्ण शब्द त्यांनी समाजाला दिला.

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत फडणवीस म्हणाले, शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. महात्मा फुले यांनी शोषित आणि वंचित समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. आज आपला भारत देश सामाजिक समरसतेवर उभा आहे. एखाद्या व्यक्तीचे मूल्य त्याच्या जातीवरून नाही, तर त्याच्या कर्तृत्वावरून, प्रतिभेवरून आणि परिश्रमावरून ठरले पाहिजे. २०२७ च्या जनगणनेत ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करावी आणि जनगणनेच्या फॉर्ममध्ये ओबीसींसाठी वेगळा कॉलम ठेवण्यात यावा, अशी मागणी केली होती.

# आम्ही देऊ तो निर्णय भविष्यात लागू होईल

## शिवसेना पक्ष व चिन्हावरील सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाची टिप्पणी

**मुंबई । वीरभूमी** – शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बाजूने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. कपिल सिब्बल यांनी पुन्हा एकदा विधीमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगवेगळे असल्याचा मुद्दा मांडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या २०२२ च्या बंडानंतर १० व्या सूचीनुसार आमदारांना अपात्र करणे गरजेचे होते, असा युक्तिवाद केला. या युक्तिवादानंतर कोर्टाने आम्हाला अपात्रता ठरवायची आहे. आम्ही देऊ तो निर्णय भविष्यासाठी लागू होईल, अशी टिप्पणी सुप्रीम कोर्टाने केली.

बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षाची नियुक्ती केली असली तरी १९८९ साली आमचा पक्ष राजकीय पक्ष म्हणून नोंद झाला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधननंतर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. यावेळी पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आली होती. संघटना स्तरावर उद्धव ठाकरेंकडे बहुमत होते. आमच्याकडून निवडणूक आयोगात सगळ्या गोष्टी मांडण्यात आल्या होत्या, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

२०१८ मध्ये निवडणूक आयोगाकडे सगळ्या गोष्टी मांडण्यात आल्या. पक्षाच्या २०१८ च्या संविधानानुसार १० पैकी ६ नेत्यांनी उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. त्यापैकी एका नेत्याचे निधन झाले आहे. नेते, उपनेते, जिल्हा प्रमुख, संपर्कप्रमुख या सर्वांनी उद्धव ठाकरेंना सपोर्ट दिला होता. त्याची कागदपत्रे आम्ही निवडणूक आयोगात सादर केली होती, असा युक्तिवाद सिब्बल यांनी कोर्टात केला.

विधिमंडळ स्तरावर शिंदेंकडे बहुमत होते. पण शिंदे पक्षाच्या घटनेत बदल करू शकत नाहीत. त्यांना तसे अधिकार नव्हते, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. विधिमंडळ पक्षात पडलेली फूट ही राजकीय पक्षाची फूट मानायची का, असा सवाल कपिल सिब्बल यांनी केला.

# विविध मागण्यांसाठी श्रमिक संघटना व ऑटो-रिक्षा संघटनेचे निवेदन

## जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांना निवेदन देत १५ ऑगस्टपासून आंदोलन करण्याचा दिला इशारा

**अहिल्यानगर । वीरभूमी** – अहिल्यानगर जिल्हा श्रमिक संघटित कष्टकरी कामगार संघटना आणि अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या वेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास कराळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात शहर व उपनगरांमध्ये कथितरित्या केमिकलयुक्त दूध तसेच विनालेबल व अनधिकृत प्लास्टिक पिशव्यांमधून दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा विक्रीवर संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा दावा संघटनेने केला असून याबाबत तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, प्रादेशिक परिवहन कार्यालय व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात एजंट आणि दलालांच्या माध्यमातून वाहनधारकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. वाहनांच्या विविध कामांसाठी दलालांची साखळी कार्यरत असून त्याची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

अहिल्यानगर शहरात मोठ्या प्रमाणावर विनापरवाना, स्क्रॅप अथवा नियमबाह्य रिक्षा प्रवासी वाहतूक करत असल्याचा आरोप करत अशा वाहनांवर तातडीने कारवाई करून ती कायमस्वरूपी बंद करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. वाहतूक शाखेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कथित हप्तेवसुली होत असून त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड केली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बस, मारुती व्हॅन व इतर वाहनांकडूनही कथित हप्तेवसुली होत असल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मोबाईल कॉल डिटेल्सची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ओव्हरलोड वाहनांकडून मोठ्या प्रमाणात हप्ते घेतले जात असल्याचाही



दावा निवेदनात करण्यात आला आहे.

संघटनेने निवेदनात इशारा देताना म्हटले आहे की, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ पासून अहिल्यानगर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर काळ्या फिती लावून बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या १५ ऑगस्ट च्या दौऱ्यावेळी त्यांना काळे झेंडे दाखविण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदन देताना विलास कराळे पाटील यांच्यासमवेत नासिर खान, बाळासाहेब साळवे, अन्वर शेख, जावेद शेख, आसिफ सय्यद, दिलावर सय्यद, ज्ञानेश्वर शिपणकर, महेश सुतार, बाबा दहिफळे, गणेश पारखे, यशराज बनसोडे, जॉन भालेराव, आसिफ शेख, सिताराम आंबेकर, तौफिक अत्तार, फारुख शेख, गोरख सुरंगे, सोपान दळवी, किशोर कुलट, अकिल रज्जाक, विष्णू दहातोंडे, निलेश मिसाळ, सिद्धांत भिंगारदिवे, आकाश वैरागर, अभिषेक सकट, ईश्वर लंगारे, विकास आव्हाड आदींसह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

SPOT NEWS

## स्नेहालयचे ३५ वे राज्यस्तरीय 'युवा निर्माण शिबीर' २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
सामाजिक जाणिवेतून बदलाच्या कृतीकडे, युवा जागृतीतून राष्ट्रनिर्माणाकडे या ध्येयाने प्रेरित होऊन वंचित घटकांसाठी गेली ३७ वर्षे कार्यरत असलेल्या स्नेहालय संस्थेतर्फे ३५ वे राज्यस्तरीय 'युवानिर्माण शिबीर' २१ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत स्नेहालय पुनर्वसन संकुल, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे. तीन दिवसीय निवासी शिबिरात २० ते ३० वयोगटातील निवडक १५० युवक–युवतींना सहभागी करून सामाजिक परिवर्तनाचे नेतृत्व घडविण्यावर भर दिला जाणार आहे. महाविद्यालयांतील एनएसएस आणि एनसीसी विद्यार्थीही या शिबिरात सहभागी होऊ शकतात. वाढता व्यक्तिवाद, बेरोजगारी, व्यसनाधीनता आणि डिजिटल माध्यमांचा अतिरेक या सामाजिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये सामाजिक जबाबदारी, मानवी मूल्ये आणि लोकशाही विचार रुजविणे हा शिबिराचा प्रमुख उद्देश आहे. शिबिरात तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सामूहिक श्रमदान, करिअर मार्गदर्शन, गटचर्चा, योगवर्ग, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रेरणागीते अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांमध्ये चारित्र्यनिर्माण, विधायक कार्याची प्रेरणा आणि सामाजिक समस्यांवर कृतीशील नेतृत्व विकसित करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन नोंदणी अनिवार्य असून प्रवेश शुल्क ३०० रुपये आहे. सहभागींसाठी निवास व भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. नोंदणीसाठी ओळखपत्र, पॅन कार्ड, छायाचित्र आणि महाविद्यालयाचे पत्र आवश्यक आहे.

## जनगणना मधील शिक्षकांचे प्रलंबित मानधन तातडीने देण्याची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
जनगणनाच्या पहिल्या टप्प्यात शासनाच्या आदेशानुसार जबाबदारी पार पाडलेल्या शिक्षकांचे प्रलंबित मानधन व वेतन तात्काळ अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक, शिक्षकेतर सेना यांच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांना देऊन त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक जनगणा–२२२६/प्र.क्र.१७/विकासअ, दिनांक १ जुलै २०२६ अन्वये जनगणना–२०२७ च्या पहिल्या टप्प्यातील कामकाजासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या शासन निर्णयामध्ये जनगणना अधिकारी, कर्मचारी, प्रगणक, पर्यवेक्षक यांचे मानधन, प्रशिक्षण, प्रवास भत्ता आणि इतर खर्चासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी शासनाच्या आदेशानुसार जनगणना–२०२७ चे काम अत्यंत जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पूर्ण केले. मात्र शासनाकडून निधी उपलब्ध होऊनही संबंधित शिक्षकांना अद्याप मानधन किंवा वेतन अदा करण्यात आलेले नसल्याची बाब गंभीर असून त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# चास येथील दादा स्वामी मंदिरात सापडले दोन शिलालेख

### इ.स. १७६३ मध्ये बाबाजी पाटील कारले यांनी श्री नरसिंह देवाचे देऊळ बांधल्याची नोंद

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
अहिल्यानगर तालुक्यातील चास–अकोळनेर रस्त्यालगत असलेल्या दादा स्वामी समाधी मंदिरात अठराव्या शतकातील दोन महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आले आहेत. यापैकी एक शिलालेख मंदिराच्या सभामंडपाच्या समोरील भिंतीवर असून, दुसरे दोन उठाव स्वरूपातील लेख मंदिराच्या गाभाऱ्यातील समाध्यांसमोर आहेत. मुख्य शिलालेख चार ओळींचा असून तो देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेला आहे. लेखाच्या काही भागाची झीज झाली असून, रंग व फरशीमुळे काही अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. मात्र छाप घेतल्यानंतर लेखाचा मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन :**
**१.श्री नरसिह देव सके १६८५**
**२.सुभानु नाव सवछरे श्राव**
**३.ण सुध १ देऊळ केले तानाजी**



**४.सुत बाबाजी पा. मो. कारले.**

या लेखानुसार शके १६८५, सुभानू नाम संवत्सर, श्रावण शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच १० ऑगस्ट १७६३, बुधवार रोजी तानाजी पाटील यांचे पुत्र मुकादम बाबाजी पाटील कारले यांनी श्री नरसिंह देवाचे देवूळ बांधल्याची नोंद आहे.

मंदिराच्या गाभाऱ्यातील दोन समाध्यांवरील उठाव स्वरूपातील लेखांमध्ये–

१. ।। हरी बाबाजी देव ।।
२. ।। श्री दादाजी देव ।।

असे उल्लेख आढळतात. या समाध्या मंदिराशी संबंधित पूजनीय धार्मिक व्यक्ती, संत किंवा महंतांच्या असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.




या शिलालेखामुळे चास परिसरातील अठराव्या शतकातील नरसिंह उपासना, स्थानिक देवस्थानांची परंपरा, ग्रामव्यवस्था आणि धार्मिक–सामाजिक जीवनावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो. देवनागरी लिपी, तत्कालीन मराठी भाषेचा वापर आणि शक–संवत्सर पद्धतीचा उल्लेख यामुळे हा लेख इतिहास, लिपीशास्त्र आणि भाषावैज्ञानिक अभ्यासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो.

या शिलालेखाचे, संशोधन, वाचन व माहिती संकलन पुणे येथील शिलालेखतज्ज्ञ अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## मृदंगाचार्य संकेत महाराज आरोटे यांना 'संगीत साधक पुरस्कार' प्रदान



● **अकोले । वीरभूमी–**
वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. गुरुवर्य बापूरावजी धामणीकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'संगीत साधक पुरस्कार' यंदा अकोले तालुक्यातील कोतूळ येथील भूमिपुत्र तथा श्री अगस्ती ऋषी अध्यात्मिक गुरुकुलचे संस्थापक–अध्यक्ष ह.भ.प. मृदंगाचार्य संकेत महाराज आरोटे यांना प्रदान करण्यात आला.

पुणे येथील कोंढवा येथे आयोजित विशेष समारंभात ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पानसरे गुरुजी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका सौ. रंजनाताई टिळेकर, उद्धव बापू शिंदे, ऋषी पानसरे, शिष्य परिवार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. संकेत महाराज आरोटे यांची कीर्तन, भजन, हरिनाम सप्ताह आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या पखवाज वादनाची साथ विशेष मानाची मानली जाते. पखवाज विषयात विशारद, तबला वादनात विशारद तसेच संगीत विषयात एम.ए. पदवी प्राप्त केलेल्या संकेत महाराज यांच्या निष्ठापूर्ण साधना, उत्कृष्ट वादनकौशल्य आणि वारकरी संप्रदायासाठीच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## भांगरेवस्ती अंगणवाडीत स्तनपान सप्ताह उत्साहात

### गरोदर व स्तनदा मातांना आरोग्य, पोषण व शासकीय योजनांची माहिती

● **अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील तांभोळ गावातील भांगरेवस्ती अंगणवाडी केंद्रात स्तनपान सप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात गरोदर माता व स्तनदा मातांना स्तनपानाचे महत्त्व, वैयक्तिक स्वच्छता, मातृ आरोग्य, कॅन्सरविषयी जनजागृती तसेच महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

यावेळी सहा महिन्यांच्या बाळाचा अन्नप्राशन सोहळा तसेच गरोदर मातांचा ओटीभरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ब्रिटानिया न्यूट्रिशियन फाउंडेशनच्या वतीने गरोदर व स्तनदा मातांना चिक्कीचे वाटप करण्यात आले, तर स्तनदा मातांना कढीपत्त्याची रोपे भेट देण्यात आली.


■ छाया । विद्याचंद्र सातपुते

कार्यक्रमास तांभोळ गावातील चारही अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा सेविका वंदना कराळे, सुनीता मांडे, सविता माने, नीता भांगरे, प्राजक्ता नवले आणि प्रियंका नवले उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे नियोजन अंगणवाडी पर्यवेक्षिका सोनाली भगवडे यांनी केले. त्यांनी उपस्थित पालकांना मातृ व बालआरोग्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ब्रिटानिया न्यूट्रिशियन फाउंडेशनचे अरविंद धोंगडे यांच्या हस्ते लाभार्थींना चिक्कीचे वाटप करण्यात आले.

# वाघोली सरपंचांसह तिघांवरील गुन्हा रद्द करण्याची मागणी

### २५ सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचे शेवगाव पोलिसांना निवेदन । पुराव्याअभावी कारवाई मागे घेण्याची भूमिका

● **शेवगाव । वीरभूमी –**
तालुक्यातील वाघोलीच्या सरपंच सुमित्रा उमेश भालसिंग, उमेश भालसिंग आणि शिवाजी भाऊराव भिसे यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला गुन्हा खोटा असून, पुराव्याअभावी तो रद्द करण्यात यावा, अशी मागणी वाघोली ग्रामपंचायतीसह शेवगाव तालुक्यातील विविध गावांतील सुमारे २५ सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांना निवेदनाद्वारे केली आहे.



■ छाया । अमोल कराळे

निवेदनात म्हटले आहे की, ४ ऑगस्ट रोजी गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या फिर्यादीवरून दाखल करण्यात आलेला बदनामीचा गुन्हा वस्तुस्थितीशी विसंगत आहे. संबंधित आंदोलन हे प्रशासनाच्या निर्णयांविरोधात होते. आंदोलनादरम्यान गटविकास अधिकारी शहा यांचे नाव किंवा त्यांच्या वैयक्तिक पदाचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नसल्याने बदनामीचा प्रश्नच उद्भवत नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

याशिवाय, प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत ग्रामस्थांनी यापूर्वीही निवेदने दिली असून संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत लोकांमध्ये नाराजी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आंदोलनासंदर्भातील मजकूर बनावट असल्याचा आरोप करण्यात आला असला, तरी त्यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने केवळ आरोपांच्या आधारे गुन्हा कायम ठेवणे योग्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

संविधानाने नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला असून आंदोलनातून वैयक्तिक बदनामी झाल्याचे सिद्ध होत नसल्याने गुन्हा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, फेसबुकवरील छायाचित्र संपादित करून प्रसारित केल्याच्या आरोपाबाबत संबंधितांकडून ठोस पुरावे सादर करावेत आणि सोशल मिडियावरील पोस्टची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनावर वाघोली ग्रामस्थांसह तालुक्यातील विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## विकास आराखडा प्रसिद्ध होण्याआधीच 'आरक्षणांचा खेळ' सुरू? : दत्तात्रय कावरे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या विकासाची दिशा ठरविणाऱ्या प्रारूप विकास आराखड्यावरून अहिल्यानगर महानगरपालिकेत वाद निर्माण झाला आहे. दि. ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. २३ अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. मात्र संपूर्ण विकास आराखडा, अधिकृत नकाशे आणि आवश्यक तांत्रिक अभिलेख नगरसेवकांना उपलब्ध करून न देता प्रस्ताव मंजूर केल्याचा आरोप शिवसेनेचे नगरसेवक तथा गटनेते दत्तात्रय हरिभाऊ कावरे यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री आणि नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.

कावरे यांच्या म्हणण्यानुसार, विकास आराखडा हा केवळ प्रशासकीय दस्तऐवज नसून शहरातील जमीन वापर, निवासी व व्यावसायिक क्षेत्रे, सार्वजनिक आरक्षणे, रस्ते, उद्याने, शाळा, रुग्णालये, बाजारपेठा, नदी–नाले, वाहतूक व्यवस्था तसेच नागरिकांच्या मालमत्तांवर दूरगामी परिणाम करणारी बाब आहे. त्यामुळे अशा महत्त्वपूर्ण प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी नगरसेवकांना संपूर्ण आराखड्याचा अभ्यास करण्याची पुरेशी संधी मिळणे आवश्यक होते.

सभेपूर्वी नगरसेवकांना संपूर्ण प्रारूप योजना, अधिकृत जमीन वापर नकाशे, आरक्षणनिहाय माहिती, नवीन आरक्षणे, बदललेली अथवा वगळण्यात आलेली आरक्षणे, प्रस्तावित रस्ते, सर्वेक्षण आणि तांत्रिक अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नसल्याचे कावरे यांनी म्हटले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# रेशनकार्डधारकांचे बंद केलेले धान्य पूर्ववत करा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन । नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आंदोलनाचा इशारा

**● शेवगाव । वीरभूमी-**

शेवगाव तालुक्यातील विविध गावांतील शेकडो ऑनलाइन रेशनकार्डधारकांना सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) अंतर्गत मिळणारे धान्य कोणतीही पूर्वसूचना किंवा कारण न देता अचानक बंद करण्यात आल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे, शेतकरी, शेतमजूर व कामगार वर्ग शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेपासून वंचित राहत असल्याने हा गंभीर प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी तहसीलदार आकाश दहाडदे यांच्याकडे करण्यात आली आहे.



■ छाया । अमोल कराळे

या संदर्भात शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार व गटविकास अधिका-यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, बंद करण्यात आलेले रेशन धान्य तात्काळ पूर्ववत सुरू करावे, घरकुल सर्वे, आराखडे आणि पीक विमा यांसारख्या नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबत ठोस निर्णय घ्यावेत शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेणाऱ्या अनेक कुटुंबांना अचानक धान्य मिळणे बंद झाल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोणतीही पूर्वकल्पना न देता लाभ बंद करण्याची पद्धत सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय करणारी असून प्रशासनाने याबाबत तातडीने दखल घ्यावी. गरीब आणि गरजू नागरिकांच्या अन्नसुरक्षेशी कोणत्याही प्रकारचा खेळ खपवून घेतला जाणार नाही. यावेळी प्रशासनाने सर्वसामान्य, शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रशासन किती वेगाने निर्णय घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

यावेळी काकासाहेब नरवडे पाटील, संजय कोळगे, कैलास नेमाणे, ताहेर पटेल, हनुमान पातकळ, अशोक धस, सुधाकर लांडे, बबनराव भुसारी, अंबादास कळमकर, गणेश खंबरे, मंगेश थोरात, संतोष धस, एकनाथ उदगे, सुनील गायकवाड, युवराज भोसले, जाकीर कुरेशी, संतोष पावशे, डॉ. भास्कर खेडेकर, राजेंद्र देशमुख, मनोहर कातकडे, मनोज तिवारी, संजय धस, बाळासाहेब पोटे, सतीश पवार, विनोद मगर, अनिल भेंडेकर, कृष्णा मडके, सचिन फटांगरे, आप्पासाहेब भुजबळ, प्रविण मरकड, तुकाराम तानवडे, बबलू व्यवहारे उपस्थित होते.

# SPOT NEWS

## प्रा. बी. एच. तेलोरे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**● अकोले । वीरभूमी –**



अकोले तालुक्यातील राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेच्या ॲड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. बी. एच. तेलोरे यांनी 'महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवसंजीवन योजनेची अंमलबजावणी व मूल्यमापन' या विषयावरील संशोधनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. प्रा. तेलोरे यांनी आपल्या संशोधनात नवसंजीवन योजनेद्वारे आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अभ्यास केला. तसेच योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी, लाभार्थ्यांवरील परिणाम, प्रशासनाची कार्यपद्धती आणि योजनेची परिणामकारकता यांचे सखोल मूल्यमापन केले. या यशाचे श्रेय त्यांनी संशोधन मार्गदर्शक प्रो. डॉ. सुरेश देवरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आवारी, वडील कै. हरिदास तेलोरे, कुटुंबीय, सहकारी तसेच संशोधनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संबंधितांना दिले. प्रा. तेलोरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव देशमुख, सचिव एम. एल. मुठे, कोषाध्यक्ष विवेकजी मदन, माजी सचिव तथा प्राचार्य टी. एन. कानवडे, संचालक प्रकाश टाकळकर, एस. टी. येलमामे, विजय पवार, संस्थेचे सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. भाऊसाहेब देशमुख, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या नियुक्तीबाबत पक्ष नेतृत्वाने दादाभाऊ कळमकर यांच्यावर विश्वास व्यक्त करताना, पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी सर्व शक्तीनिशी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. राज्यभर पक्षाची ताकद वाढविणे, तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देणे आणि समाजातील सर्व घटक व विविध संघटनांना सोबत घेऊन पक्षाचे ध्येय-धोरण प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या विचारांचा प्रसार राज्याच्या कानाकोपऱ्यात करण्यासाठी सातत्याने कार्य करावे, अशा सूचनाही पक्ष नेतृत्वाने दिल्या आहेत. दादाभाऊ कळमकर यांनी पक्ष नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पद्मभूषण अण्णा हजारे यांची विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी घेतली भेट



**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

राज्याचे विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी ज्येष्ठ समाजसेवक, पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची राळेगण सिद्धी येथे जाऊन भेट घेत विचारपूस केली. अण्णा हजारे यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशा सदिच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

गेल्या तीन दिवसांपूर्वी अण्णा हजारे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आवश्यक वैद्यकीय उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने ते राळेगण सिद्धी येथे परतले. त्यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.

यावेळी प्रा. शिंदे यांनी अण्णा हजारे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या आरोग्याची सविस्तर माहिती घेतली. तसेच त्यांनी उपस्थित सहकाऱ्यांशीही चर्चा करून उपचारांबाबत माहिती जाणून घेतली. अण्णा हजारे यांचे समाजकार्यातील योगदान प्रेरणादायी असून त्यांनी उत्तम आरोग्य लाभून पुन्हा पूर्ववत सामाजिक कार्यात सक्रिय व्हावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी लाभेश औटी, सुरेश पठारे, रोहन मांडे, जयसिंग मापारी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## पाथर्डी-अक्कलकोट अतिजलद बससेवा सुरू; भाविक व प्रवाशांकडून उत्स्फूर्त स्वागत

### दीर्घकाळाच्या मागणीला यश । पंढरपूरसाठीही लवकरच बस सुरू होणार

**● पाथर्डी । वीरभूमी-**

भाविक, व्यापारी आणि प्रवासी संघटनांच्या दीर्घकाळाच्या मागणीची दखल घेत पाथर्डी आगाराने अखेर पाथर्डी-अक्कलकोट अतिजलद बससेवा सुरू केली आहे. या सेवेचे प्रवासी व भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले आहे.




पाथर्डी तालुक्यातून सोलापूर, हैदराबाद येथे व्यापारासाठी तसेच तुळजापूर आणि अक्कलकोट येथे धार्मिक पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रवास केला जातो. यापूर्वी अनेक प्रवाशांना बीड किंवा अहिल्यानगर येथे बस बदलून जावे लागत होते. नव्या सेवेने हा प्रवास अधिक सोयीचा झाला आहे.

आगारप्रमुख अमित बनसोडे यांनी सांगितले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे प्रवाशांची जुनी मागणी पूर्ण करता आली. पाथर्डी आगाराला नुकत्याच पाच नवीन 'जिजाऊ' बसेस मिळाल्या असून त्यापैकी एक बस या मार्गावर सुरू करण्यात आली आहे.

ही बस सकाळी ८ वाजता पाथर्डीतून सुटून शिरूर कासार, बीड, मांजरसुंबा, येडशी, धाराशिव, तुळजापूर आणि सोलापूर मार्गे सायंकाळी ५ वाजेपर्यंत अक्कलकोट येथे पोहोचते. भाविकांच्या सोयीसाठी बस अक्कलकोट येथे रात्रभर मुक्काम करून सकाळी ६.३० वाजता परतीच्या प्रवासाला निघते आणि दुपारी ३ वाजता पाथर्डीत दाखल होते. या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बनसोडे यांनी केले. तसेच पंढरपूरसाठी नियमित बससेवा सुरू करण्याचाही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

पाथर्डी आगाराला आणखी लांब पल्ल्याच्या बसेसची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेगाव, गंगापूर, वैजापूर, वणी, माहूरगड, जेजुरी तसेच पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तिसगाव-वांबोरी मार्गे नाशिक-त्र्यंबकेश्वर बससेवा सुरू करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यासाठी पाथर्डी आगाराला किमान दहा नवीन बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रवासी संघटनेची मागणी मान्य केल्याबद्दल सरचिटणीस मुकुंद गर्जे, राजेंद्र जोशी, अनिल खाटेर, अमोल गर्जे यांनी राज्य परिवहन महामंडळाचे आभार मानले. तसेच उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे आणि स्वामी समर्थ केंद्राच्या सेवेकऱ्यांनीही या निर्णयाचे स्वागत केले.

## ब्राम्हणवाड्यात अवैध दारूविक्रीवर छापा; १०.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई । चौघांवर गुन्हा दाखल



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

**● अकोले । वीरभूमी-**

तालुक्यातील ब्राम्हणवाडा-बोटा रोडलगत स्वामी समर्थ अकॅडमी शेजारी पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या अवैध देशी-विदेशी दारूविक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून चौघांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत सुमारे १० लाख ५२ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात अनिष बाबू पटेल (वय ५८), नदीम याकुब पटेल (वय ३१) आणि नाजीम अनिष पटेल (वय ३१, सर्व रा. ब्राम्हणवाडा, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांच्याकडून ४९ हजार १७० रुपयांची देशी व विदेशी दारू, ५१ हजार ३३० रुपयांचे दोन मोबाईल, ६०० रुपये रोख, १ लाख रुपयांची टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी आणि ८ लाख ५० हजार रुपयांची हुंडाई कार (क्र. MH-14-J--4946) असा एकूण १० लाख ५१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याच कारवाईदरम्यान ब्राम्हणवाडा येथील उत्तम आनंद शिंदे हा बेकायदेशीरपणे देशी दारू विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून १ हजार ७९० रुपयांचा देशी दारूचा साठा जप्त करून त्याच्यावरही कारवाई करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## दहा कोटी नशामुक्त महाअभियान

### प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय व स्नेहालयाचा उपक्रम

**● पारनेर । वीरभूमी –**

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय सेंटर व स्नेहालय संचलित उडान प्रकल्प अंतर्गत नुकतेच दहा कोटी नशामुक्त महाअभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जनजागृती निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. सादिक राजे यांनी, शालेय स्तरावर व्यसनमुक्तीविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाल्यास सुदृढ व व्यसनमुक्त समाज निर्माण होईल, असा मोलाचा संदेश दिला.



आजची युवा पिढी विविध व्यसनांच्या आहारी जात असताना, त्यांना या मार्गापासून दूर ठेवण्यासाठी हे महाअभियान अत्यंत स्तुत्य आणि काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, आमची शाळा या देशव्यापी अभियानात पूर्ण जोमाने सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला पारनेर परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक व तज्ज्ञ उपस्थित होते. यात प्रामुख्याने ब्रह्माकुमारी साधना दिदी, डॉ. सादिक राजे, संभाजी मगर, मीरा पुजारी, ॲड. शिवाजीराव जाधव, राम भाई, पत्रकार भगवान गायकवाड, देवराम खोडदे, हिराबाई मगर, अरुणा औटी यांसारख्या अनेकविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून या अभियानाला पाठिंबा जाहीर केला.

ब्रह्माकुमारी साधना दिदींचे प्रास्ताविक व अभियानाची रूपरेषा प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ब्रह्माकुमारी साधना दिदी यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून देशभरात सुरू असलेल्या 'नशामुक्त भारताच्या' कार्याची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यात 'दहा कोटी नशामुक्त महाअभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

व्यसनमुक्त समाजाची गरज आजच्या धावपळीच्या युगात आणि आधुनिक जीवनशैलीत तरुणाई व्यसनांच्या विळख्यात अडकत चालली आहे, जी मानवी आरोग्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत घातक आहे. यावर मात करण्यासाठी केवळ कायदे किंवा पोलिसांची कारवाई पुरेशी नाही, तर तळागाळातील लोकांमध्ये आणि विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर नैतिक मूल्यांचे संस्कार करणे गरजेचे आहे. विद्यार्थी हा देशाचाभावी नागरिक असल्याने, त्याचे बालपण आणि विद्यार्थी दशा व्यसनमुक्त राहिल्यास, भविष्यात संपूर्ण समाज आणि देश व्यसनमुक्त होण्यास नक्कीच मदत होईल, असा सूर या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

# अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानात ना. शिंदे, विखे पाटील एकत्र

## व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे यावे : सभापती प्रा.राम शिंदे | तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आपले भविष्य घडवावे : पालकमंत्री विखे पाटील

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** आजचा तरुण हा देशाच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार आहे. तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनाच्या आहारी जाऊ नये, तसेच व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या व्यक्तींना त्यापासून परावृत्त करून व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन केले विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी केले.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात जनजागृतीला चालना दिली जात असल्याचे सांगितले. तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आपले भविष्य घडवावे, असे आवाहन करत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने राबविलेल्या या जनजागृती अभियानाचे त्यांनी कौतुक केले.

अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलातर्फे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. ' एक निर्धार, एक संकल्प, एक भविष्य ' व्यसनमुक्ती जिल्ह्याच्या दिशेने एक सामूहिक पाऊल या संकल्पनेवर आधारित या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने शहरात व्यसनमुक्त रॅलीचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी शहरातील अनेक शाळा, महाविद्यालयांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभापती प्रा शिंदे म्हणाले की, तरुणांची ऊर्जा, बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व हे राष्ट्राच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत. मात्र अंमली पदार्थ आणि व्यसनांच्या वाढत्या विळख्यामुळे अनेक तरुणांचे शिक्षण, करिअर, आरोग्य आणि कुटुंबीयांचे सुख धोक्यात येत आहे.अहिल्यानगरचे भविष्य उज्ज्वल राहिले तरच राज्याचे आणि पर्यायाने देशाचे भविष्य उज्ज्वल होणार आहे. तरुणांनी देखील या अभियानाचा भाग होऊन चुकीच्या गोष्टी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध माहिती देऊन पोलिसांना सहकार्य करावे. तरुणांनी व्यसनाच्या नाही तर स्वप्नांना होकार देण्याचे आवाहन विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी यावेळी केले.

पालकमंत्री डॉ विखे पाटील म्हणाले की, अंमली पदार्थांचे सेवन केवळ व्यक्तीचे आरोग्य बिघडवत नाही, तर त्याच्या कुटुंबावर, समाजावर आणि देशाच्या प्रगतीवरही विपरीत परिणाम करते. व्यसनामुळे मानसिक ताण, आर्थिक नुकसान, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि सामाजिक विघटनाला चालना मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक तरुणाने व्यसनापासून दूर राहून शिक्षण, कौशल्य विकास, क्रीडा, कला, उद्योग आणि समाजसेवा यांसारख्या सकारात्मक क्षेत्रांमध्ये स्वतःला घडविण्याचा निर्धार करणे ही काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले.




आमदार विक्रम पाचपुते म्हणाले की, पोलिस अधीक्षक कार्यालयातर्फे या अभियानाचे खूप चांगल्या प्रकारे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानामुळे नागरिकांमध्ये व्यसनमुक्ती बाबत जनजागृती निर्माण होणार आहे. तरुणांनी देखील व्यसनाकडे न वळता भविष्याकडे लक्ष द्यावे असेही ते म्हणाले.

आमदार श्री दाते म्हणाले की, व्यसन हे आपल्या समाजाला लागलेली किड आहे. आपल्या देशातील तरुणांनी व्यसनाकडे वळू नये. आपले ध्येय निश्चित करून त्या दिशेने तरुणांनी मार्गक्रमण करावे. तरुणांनी व्यसनमुक्तीच्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन म्हणाले की, व्यसनमुक्त समाजासाठी आजच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरुण आपल्या देशाचे भविष्य आहे. आपले भविष्य नशामुक्त राहणे गरजेचे आहे. ' नशामुक्त भारताचे' स्वप्न आपल्याला पूर्ण करायचे आहे असेही ते म्हणाले. तरुणांनी समाज माध्यमाचा उपयोग केवळ आपल्या विकासासाठी करावा. समाज माध्यम हाताळताना देखील खबरदारी घ्यावी असेही ते म्हणाले.

या अभियानांतर्गत शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीत विद्यार्थी, युवक, स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# धर्मांतराचा दबाव, हुंड्याची मागणी; पतीसह नऊ जणांवर पाथर्डीत गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी–** तालुक्यातील पूर्व भागातील एका छोट्या गावातील ३० वर्षीय विवाहित महिलेने शेजारच्या तालुक्यातील सासरच्या मंडळींविरोधात गंभीर आरोप करत पतीसह नऊ जणांविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. धर्मांतरासाठी दबाव, कार खरेदीसाठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची मागणी, गर्भपातासाठी सक्ती तसेच मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला असून, या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेचा विवाह २१ ऑगस्ट २०२२ रोजी अरुण पोपट पवार यांच्याशी झाला होता. लग्नानंतर सुमारे दहा महिने संसार सुरळीत सुरू होता. त्यानंतर पती व सासरच्या मंडळींकडून कार खरेदीसाठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची मागणी करण्यात येऊ लागली. मागणी पूर्ण न केल्याने शिवीगाळ, मारहाण आणि मानसिक छळ करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

तक्रारीनुसार, सासरच्या मंडळींकडून ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी सातत्याने दबाव टाकण्यात आला. गर्भधारणेनंतर पतीने गर्भाबाबत संशय व्यक्त करून गर्भपात करण्यास भाग पाडले. गर्भ ठेवायचा असल्यास घरात राहू देणार नाही, अशी धमकी देत मारहाण व शिवीगाळ करण्यात आल्याचाही आरोप आहे.

सततच्या कथित छळाला कंटाळून संबंधित महिला माहेरी परत गेली. त्यानंतर १६ फेब्रुवारी २०२४ रोजी तिने मुलाला जन्म दिला. मात्र, मुलाच्या जन्मानंतरही पतीने तिला नांदवून घेण्यास नकार दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी महिलेने प्रथम अहिल्यानगर येथील भरोसा सेलमध्ये तक्रार दाखल केली होती. समुपदेशनासाठी दोन्ही पक्षांना अनेकदा बोलावण्यात आले; मात्र समेट न झाल्याने आणि पतीने पत्नीला स्वीकारण्यास नकार दिल्याने गुन्हा दाखल करण्याचा सल्ला देण्यात आला.

त्यानुसार पाथर्डी पोलिसांनी अरुण पोपट पवार, लिलाबाई पोपट पवार, पोपट गवाजी पवार, मायकल पोपट पवार, मनीषा मायकल पवार, कुसुम राजू बनसोडे, राजू बनसोडे तसेच हारेगाव (ता. श्रीरामपूर) येथील बेंजामीन उर्फ बाबुराव छबुराव मंडलीक आणि मीना बेंजामीन उर्फ बाबुराव मंडलीक अशा नऊ जणांविरुद्ध हुंड्याची मागणी, मानसिक व शारीरिक छळ, धर्मांतरासाठी दबाव, गर्भपातासाठी सक्ती, मारहाण आणि दमदाटी केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास पाथर्डी पोलिस करीत आहेत.

# भिमाशंकर ज्योतिर्लिंग व ओझर गणपती दर्शनासह स्वच्छता अभियान राबवत हरदिन मॉर्निंग ग्रुपचा पर्यावरण संदेश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** वर्षभर पर्यावरण संवर्धन, आरोग्य जनजागृती आणि सामाजिक उपक्रमांद्वारे शहरात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सदस्यांसाठी पुणे जिल्ह्यातील पवित्र भिमाशंकर ज्योतिर्लिंग तसेच अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझर येथील श्री विघ्नहर गणपती दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत धार्मिक पर्यटनाबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दोन्ही मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले आणि भिमाशंकर परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

भिमाशंकरच्या निसर्गरम्य वातावरणात सर्व सदस्यांनी भगवान शंकराचे दर्शन घेऊन राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीची तसेच पर्यावरण संतुलित राहण्याची प्रार्थना केली. दर्शनानंतर सदस्यांनी मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवत प्लास्टिक व इतर टाकाऊ कचरा गोळा करून स्वच्छतेचा संदेश दिला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.



यानंतर सदस्यांनी अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझर येथील श्री विघ्नहर गणपतीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. दर्शनानंतर तेथेही मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून भाविकांना स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. धार्मिक स्थळांचे पावित्र्य राखणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि निसर्गाचे जतन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

हरदिन मॉर्निंग ग्रुप गेल्या अनेक वर्षांपासून नियमित वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्यविषयक जनजागृती, सामाजिक सेवा आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमात संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्यासह जहीर सय्यद, सचिन चोपडा, दिलीप गुगळे, दिलीप ठोकळ, सरदारसिंग परदेशी, विकास भिंगारदिवे, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, विलास आहेर, मनोहर दरवडे, रतन मेहेत्रे, दीपक घोडके, सुधीर कपाळे, अविनाश जाधव, सुभाष पेंढूरकर, इंजि. अनिल सोळसे, प्रकाश देवळालीकर, दीपक घाडगे, अशोक लोंढे, शिरीष पोटे, रामनाथ गर्जे, राजू शेख, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, सुहास देवराईकर, सखाराम अळकुटे, विठ्ठल निमसे, योगेश चौधरी, राजेश तनपुरे, कुमार धतुरे, शशिकांत पवार, अनिल हळगावकर, मच्छिंद्र बेरड, महादेव ढाकणे, सिद्धू बेरड, राजकुमार मोरे, संतोष चोपडा आदी सदस्य मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ म्हणाले, भक्ती आणि सामाजिक कर्तव्य यांचा सुंदर संगम घडविणे ही काळाची गरज आहे. मंदिरात दर्शन घेण्याबरोबरच मंदिर परिसर आणि पर्यावरण स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही प्रत्येक भाविकाने स्वीकारली पाहिजे. वृक्षारोपण आणि स्वच्छता ही केवळ एकदिवसीय मोहीम नसून ती आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनली पाहिजे, असे सांगितले.

# जीपीएसयुक्त ई-मोजणी नकाशासाठी शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे महत्त्वपूर्ण पाऊल

## ई-मोजणी २.० ची प्रभावी अंमलबजावणी, जीपीएसयुक्त 'क' प्रत, सर्व पाणंद रस्त्यांची ऑनलाइन नोंदणी व सरसकट ई-मोजणीची राज्यव्यापी मागणी

**● पारनेर । वीरभूमी –** राज्यातील महसूल व्यवस्थेत पारदर्शकता, मोजणी प्रक्रियेत अचूकता आणि शेतकऱ्यांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. ई-मोजणी २.० अंतर्गत प्रत्येक मोजणी प्रकरणात अक्षांश व रेखांश समन्वयांसह अंतिम 'क' प्रत मोजणी नकाशा नागरिकांना देणे बंधनकारक करावे, तसेच नमुना १-फ मधील सर्व शेत व पाणंद रस्त्यांची ऑनलाइन नोंदणी करून त्यांची सरसकट ई-मोजणी करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौंदाणे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. २५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार ई-मोजणी २.० प्रणालीद्वारे करण्यात येणाऱ्या प्रत्येक मोजणी प्रकरणात अंतिम 'क' प्रत मोजणी नकाशा जीपीएस समन्वयांसह अर्जदाराला देणे बंधनकारक आहे. शासनाने जीआयएस, जीएनएसएस आणि ई-मोजणी २.० सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून मोजणी प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व अचूक केली असली, तरी अनेक ठिकाणी आजही जीपीएस समन्वयांशिवाय जुन्या पद्धतीचे मोजणी नकाशे दिले जात असल्याने शासनाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची बाब पवळे यांनी निदर्शनास आणून दिली.

निवेदनामध्ये नमुना १-फ मधील सर्व शेत व पाणंद रस्त्यांची ई-मोजणी २.० प्रणालीमध्ये ऑनलाइन नोंदणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत प्रत्येक गावातील नोंद असलेल्या तसेच नोंद नसलेल्या सर्व शेत व पाणंद रस्त्यांची सरसकट ई-मोजणी करून त्यांची डिजिटल नोंद तयार करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

पवळे यांनी निवेदनात नमूद केले की, ई-मोजणी २.० अंतर्गत प्रत्येक हद्दबिंदूचे अक्षांश व रेखांश निश्चित होत असल्यामुळे भविष्यातील सीमावाद, ओव्हरलॅप, गॅप, अतिक्रमण आणि मोजणीतील तफावत मोठ्या प्रमाणात टाळता येईल. जीपीएसयुक्त मोजणी नकाशा हा केवळ तांत्रिक दस्तऐवज नसून शेतकऱ्यांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण करणारा महत्त्वाचा पुरावा ठरू शकतो. तसेच महसूल, भूमी अभिलेख, ग्रामपंचायत, मंडळ अधिकारी, तलाठी व संबंधित विभागांना तातडीने आवश्यक सूचना देऊन शासनाच्या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि यापुढे जीपीएस समन्वयांशिवाय कोणताही 'क' प्रत मोजणी नकाशा वितरित होणार नाही, याची खात्री करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय नमुना १-फ मधील सर्व शेत व पाणंद रस्त्यांची ऑनलाइन नोंदणी करून राज्यभर एकसमान डिजिटल नोंदवही तयार करण्याची आवश्यकता पवळे यांनी अधोरेखित केली. यामुळे भविष्यातील विकासकामे, शेतरस्त्यांचे रुंदीकरण, अतिक्रमण हटविण्याची कारवाई आणि न्यायालयीन प्रक्रियेसाठी अचूक व अद्ययावत अभिलेख उपलब्ध होतील. तसेच शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाणंद रस्त्यांचे संरक्षण, सीमावादांमध्ये घट आणि महसूल अभिलेख अधिक सक्षम होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




पारनेरमधून सुरू झालेली ही मागणी केवळ एका तालुक्यापुरती मर्यादित नसून, राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि न्याय्य मोजणी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा तिचा व्यापक उद्देश आहे. ई-मोजणी २.० ची प्रभावी अंमलबजावणी, जीपीएसयुक्त मोजणी नकाशे आणि सर्व पाणंद रस्त्यांची डिजिटल नोंद ही राज्याच्या महसूल व्यवस्थेसाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी व्यक्त केला.